# मराठी विभाग

## सभा इतिवृत्त

आज दि. २०।८।२०२१ रोजी मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांची सभा महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या वार्षिक नियोजनासंदर्भात चर्चा करून निर्णय घेण्यात आले. सभेस खालील प्राध्यापक उपस्थित होते. (मराठी विभागात ११ वा.)

प्र. प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी
मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे
डॉ. बाळासाहेब अनुसे
प्रा. साईनाथ पाचारणे
प्रा. प्रतिक्षा खरडे

विषय क्र. १ – शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी मराठी विभागांतर्गत एकूण कार्यभार, त्याचे वाटप, वार्षिक नियोजनासंदर्भात चर्चा करून निर्णय घेण्यात आला. डॉ. संजय शिंदे, डॉ. अनुसे, प्रा. खरडे व प्रा. पाचारणे यांना online workload घेण्याविषयी सांगण्यात आले.

विषय क्र. २ – डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचे ठरले. त्यानुसार डॉ. कैलास महाले (एस. एस. जे. एम. महाविद्यालय, कोपरगाव) यांचे महाविद्यालयीन तरुणाई व वाचन संस्कृती या विषयावर व्याख्यान आयोजीत (online) करण्याचे ठरले. तसेच online काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्याचे ठरले.

विषय क्र. ३ – वाचन दिनाचे औचित्य साधून प्रथम वर्ष वाणिज्य व प्रथम वर्ष कला या शाखेतील सुमारे ९०० विद्यार्थ्यांना अल्पदरात मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्याचे ठरले. या कार्यक्रमासाठी मा. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेबांना आमंत्रित करण्याचे ठरले.

विषय क्र. ४ – दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी साधना साप्ताहिकाच्या युवा दिवाळी व बालकुमार दिवाळी अंकांचे (सुमारे १००) वाटप करण्यात यावे. (विभागाच्या वतीने) असे ठरले. या कार्यक्रमासाठी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब, उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर यांना आमंत्रित करण्याचे ठरले. मा. प्र. प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

वरील विषयांवर चर्चा होऊन सभा समाप्त झाली.

(डॉ. संजय शिंदे)
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय

Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal.Khed, Dist.Pune.